# मिरा भाईंदर महानगरपालिका

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

जा.क्र. मनपा/आयुक्त/६५ /२०२२-२३
आयुक्त यांचे कार्यालय
दि. २० /०९/२०२२

**ई-मेलद्वारे**

**आदेश**

विषय:- PG Portal वरील प्रलंबित संदर्भाबाबत.

संदर्भ:- १. महाराष्ट्र शासन, नगर विकास विभागाकडील क्रमांक: संकिर्ण-१८२२/ सं.क्र.१४०६/नवि-२८, दि.१६ सप्टेंबर, २०२२ रोजीचे पत्र.
२. जा.क्र. मनपा/आयुक्त/६४/२०२२-२३, दि.१३/०९/२०२२ रोजीचे आदेश.

महानगरपालिकेच्या विविध विभागाचे प्रलंबित PG Portal संदर्भ दि.३०/०९/२०२२ रोजी पर्यंत निकाली काढून त्याबाबतचा अहवाल कार्यासनास सादर करणेबाबत शासनाने उपरोक्त संदर्भ क्र.१ अन्वये कळविले आहे.

तसेच शासनाच्या "राष्ट्रनेता ते राष्ट्रपिता सेवा पंधरवडा" अंतर्गत दि.१७ सप्टेंबर, २०२२ ते दि.२ ऑक्टोबर, २०२२ या कालावधीत विविध शासकीय पोर्टलवरील सर्व प्रलंबित संदर्भ, विभागाकडील प्राप्त/प्रलंबित अर्ज; तसेच महापालिका देत असलेल्या विविध सेवा (जसे विवाह नोंदणी प्रमाणपत्र, मालमत्ता हस्तांतरण नोंद, नव्याने नळ जोडणी, मालमत्ता कराची आकारणी करणे व मागणी पत्र) यांचा निपटारा करुन तसे प्रमाणपत्र सादर करणेबाबत यापूर्वीच संदर्भ क्र.२ अन्वये आपणांस आदेशित करण्यात आले आहे.

त्या अनुषंगाने सर्व विभागप्रमुख/खातेप्रमुख यांनी दि.३०/०९/२०२२ रोजी सकाळी ११.०० वाजता आयुक्त सभाकक्षात उपस्थित राहून आपले विभागाशी निगडीत शासकीय पोर्टलवरील तक्रारी निरंक असल्याचे Online दाखवून तसे विहित नमुन्यातील प्रमाणपत्र (सोबत नमुना जोडला आहे) समक्ष सादर करावयाचे आहे.

करिता आदेशित करण्यात येत आहे.

(दिलीप ढोले)
आयुक्त तथा प्रशासक
मिरा-भाईंदर महानगरपालिका

**प्रति,**

१. अतिरिक्त आयुक्त (१) व (२)
२. विभागप्रमुख / खातेप्रमुख (सर्व)
३. स्थळप्रत.

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## --------------- विभाग

## प्रमाणपत्र

### सेवा पंधरवडा (दि.१७ सप्टेंबर, २०२२ ते दि.०२ ऑक्टोबर, २०२२)

प्रमाणित करण्यात येते की, मिरा भाईंदर शहरामध्ये दि.१७ सप्टेंबर, २०२२ ते दि.०२ ऑक्टोबर, २०२२ या कालावधील राबविण्यात आलेल्या सेवा पंधरवड्यामध्ये ----------------------- विभागामार्फत देण्यात येणाऱ्या सेवांसाठी दि.२७ सप्टेंबर, २०२२ अखेर प्रलंबित असलेल्या एकूण ----------- संदर्भ/अर्ज पैकी ----------- संदर्भ/अर्ज यांची निर्गती करण्यात आली. तसेच दि.३० सप्टेंबर, २०२२ रोजी ------------ संदर्भ/अर्ज प्रलंबित राहिले आहेत. त्याची कारणे माझ्या कार्यकक्षेबाहेरील जसे की (अर्धन्यायिक/न्यायप्रविष्ठ इ.) असल्याने मला निर्गती करता आली नाही.

उपरोक्तप्रमाणे दिलेली माहिती संपूर्ण पडताळणी अंती देण्यात येत असून सदरची माहिती चुकीची अथवा खोटी आढळून आल्यास त्यासाठी मी सर्वस्वी जबाबदार राहीन, याची मला जाणीव आहे.

स्वाक्षरी
(अधिकाऱ्याचे नाव)
पदनाम
मिरा भाईंदर महानगरपालिका

## प्रगती अहवाल

(दि.२७/०९/२०२२ अखेर प्राप्त अर्ज/संदर्भ)

| शिर्षक | प्राप्त अर्ज/ संदर्भ (संख्या) | निर्गती केलेले अर्ज/ संदर्भ (संख्या) | प्रलंबित अर्ज/ संदर्भ (संख्या) | प्रलंबित राहण्याबाबत स्वयंस्पष्ट कारणमिमांसा |
|---|---|---|---|---|
| पीजी पोर्टल | | | | |
| आपले सरकार | | | | |
| मनपा पोर्टल | | | | |
| शासकीय पत्र | | | | |
| दैनंदिन सेवा अर्ज | | | | |